महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

क्र.मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉटनं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ६१९ दिनांक १७ / ०२ / २०२१

**विषय** : सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत.

**संदर्भ** : प्रशासकीय परिपत्रक क्र. ५८९ दि. १६.०९.२०१९.

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, यांचा शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि. २३.१२.२०२० अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांना सन २०२०-२१ या वर्षातील शैक्षणिक प्रवेश घेण्यासाठी व सरळसेवा भरतीकरीता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ईडब्ल्युएस) प्रमाणपत्र देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सक्षम अधिकारी यांनी सदर शासन निर्णयाव्दारे प्रसारीत केलेल्या सूचना कंपनीअंतर्गत अंगिकृत करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

२. सबब, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दि. २३.१२.२०२० ची प्रत सोबत जोडली असून, शासनाने प्रसारीत केलेल्या सूचनांचे अवलोकन करावे व त्याबाबतची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.

३. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत** : दि. २३.१२.२०२० रोजीचा शासन निर्णय.

**(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

Scanned by CamScanner

**सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचा लाभ देण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २३ डिसेंबर, २०२०

**वाचा:-** १. शासन निर्णय क्रमांक राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२ फेब्रुवारी, २०१९
२. शासन पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. २० मार्च, २०१९
३. शासन पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. २६ एप्रिल, २०१९
४. शासन पत्र क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. ६ सप्टेंबर, २०१९
५. सा.प्र.वि., परिपत्रक क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. २८जुलै, २०२०
६. सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६ ब, दि.९ ऑक्टोबर २०२०
७. सा.प्र.वि., शासन निर्णय क्र. बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६ ब, दि.२४ नोव्हेंबर २०२०

**प्रस्तावना :-**

संसदेने संविधानात १०३ व्या घटनादुरूस्तीनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये १० टक्के आरक्षण विहित केलेले आहे. त्यानुसार राज्य शासनाने संदर्भ क्र.१ अन्वये खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये १० टक्के जागा आरक्षित केल्या आहेत. सदर आरक्षणाच्या लाभासाठी ज्या घटकांना कोणत्याही मागास प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ दिला जात नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

२. राज्यातील शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये राज्यात सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) या वर्गास आरक्षण देण्यात आलेले असल्याने या वर्गास आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अनुज्ञेय असलेले १० टक्के आरक्षण लागू होत नाही. तथापि, केंद्र शासनाच्या मागास प्रवर्गाच्या यादीमध्ये मराठा समाजाचा समावेश नसल्याने केंद्र शासनाच्या अखत्यारीतील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाच्या जागा व सेवेतील भरतीसाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या आरक्षणाकरीता महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्ग पात्र आहे. यासंदर्भात, शासनाने संदर्भ क्र.२ ते ५ अन्वये, रोजीच्या पत्रान्वये आवश्यक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

३. मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांवरील दि.०९.०९.२०२० रोजीच्या सुनावणीत एसईबीसी आरक्षणास अंतरीम स्थगिती दिली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरीम स्थगिती आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेश हे एसईबीसी अधिनियमातील आरक्षणाशिवाय करण्यात यावे. तसेच शासन सेवेतील पदावरील नियुक्त्या सुध्दा अधिनियमातील आरक्षणाशिवाय करण्याबाबत आदेश आहेत. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेली अंतरीम स्थगिती उठविण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयात मोठ्या खंडपीठाकडे शासनाच्या वतीने विनंती अर्ज दाखल करण्यात आला आहे. तथापि, अद्याप सदर प्रकरणी न्यायनिर्णय प्रलंबित आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरीम स्थगिती आदेशामुळे संदर्भ क्र. ७ अन्वये सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील दि.९.९.२०२० रोजीनंतरच्या शैक्षणिक प्रवेशांना एसईबीसी आरक्षण न ठेवता पार पाडण्याबाबत तसेच दि.९.९.२०२० पूर्वी प्रवेशासाठी अर्ज केले असतील व प्रवेश देण्यात आले नसतील तर अशा एसईबीसी घटकातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. ९५९३४/२०२०, ९८०६६/२०२०, ९८३०९/२०२०, ९७७५७/२०२०, ९८३००/२०२० तसेच मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र. ७४५५/२०२०, याचिका क्र.७८७६/२०२०, २१८१२/२०२०, २२३४७/२०२०, २२४२५/२०२०, ८०७२/२०२०, ८०८४/२०२०, ८०९४/२०२० दाखल करण्यात आलेल्या आहेत. काही याचिकांमध्ये अंतिम निकाल देण्यात आलेला असून एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश देण्यात आलेले आहेत. याचिका क्रमांक ९८०६६/२०२० मध्ये दिनांक ८.१.२०२० पूर्वी एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्यूएसचे प्रमाणपत्र देण्याबाबत मा.उच्च न्यायालय मुंबई येथे शपथपत्र दाखल करावयाचे आहे. तसेच याचिका क्रमांक ८०७२/२०२० , ८०८४/२०२०, ८०९५/२०२० मध्ये न्यायालयाने "It would have been appropriate if the Government would have taken a decision as to whether the benefit of EWS ought to be granted to the candidates, who have applied from SEBC category and the said reservation is stayed by the Apex Court. It appears that the decision to that effect has not been taken" असे निरिक्षण नोंदविले आहे. सदर बाब विचारात घेता, सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवार राज्यात खुल्या प्रवर्गातून प्रवेशाकरीता पात्र असल्याने या वर्गास मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेश व सरळसेवा भरतीसाठी खुल्या प्रवर्गातील ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ देण्यासाठी ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :**

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ९.९.२०२० रोजीच्या अंतरिम स्थगिती आदेश विचारात घेता, सद्य:स्थितीत सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांना सन २०२०-२१ या वर्षातील शैक्षणिक प्रवेश घेण्यासाठी व सरळसेवा भरतीकरीता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ईडब्ल्युएस) प्रमाणपत्र देण्यास मान्यता देत आहे.

२. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ईडब्ल्युएस) प्रमाणपत्र देण्याच्या कार्यवाहीस्तव संबंधित सक्षम प्राधिकारी सर्व विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी/सर्व निवासी उप जिल्हाधिकारी/सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांनी विशेष मोहिम राबवून संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेशप्रक्रियेपूर्वी प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी. याकरीता विशेष कक्षाची स्थापना करुन विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या दृष्टीने प्रमाणपत्र प्राथम्याने देण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने करावी.

३. सदर प्रमाणपत्र निर्गमित करताना, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांना मागील आर्थिक वर्षाच्या उत्पन्न व मत्ता या आधारे राज्य शासनाने विहित केलेले निकषाप्रमाणे विहित प्रपत्रातील " महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम २०१८ (सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२ )" **हा अधोरेखित भाग वगळून** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ईडब्ल्युएस) प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी करावी.

४. तसेच केंद्र शासनाच्या सेवा व शैक्षणिक प्रवेशासाठी केंद्र शासनाने आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आरक्षणासाठी संदर्भ क्र.२ मध्ये नमूद केल्यानुसार विहित निकष व विहीत विवरणपत्रात स्वतंत्र प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी करावी.

५. सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासप्रवर्गातील उमेदवारांना खुल्या प्रवर्गात अथवा ईडब्ल्यूएस आरक्षणातून लाभ घेणे ऐच्छिक असेल.

६. उमेदवाराने शैक्षणिक प्रवेशातील अथवा शासन सेवेत भरतीकरीत ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ घेतल्यास सदर उमेदवार एसईबीसी आरक्षणाच्या लाभास पात्र ठरणार नाही.

७. सदरचे आदेश हे मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांमधील अंतरीम आदेशावरील निर्णयाच्या अथवा अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

८. हा शासन निर्णय शासकीय/ निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका / महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय विद्यालय, महाविद्यालय, शासकीय शैक्षणिक संस्था, खाजगी विद्यालय, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था, अनुदानित/विना अनुदानित विद्यालय, महाविद्यालय व शैक्षणिक संस्था आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे, अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांना लागू राहील. संबंधित यंत्रणांनी याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२०१२२३१६३४५४६८०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TIKARAM WAMAN KARPATE

Digitally signed by TIKARAM WAMAN KARPATE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=TIKARAM WAMAN KARPATE
Date: 2020.12.23 18:12:28 +05'30'

**(टि.वा.करपते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल ,मुंबई.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,
१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३.प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४.प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी/सर्व विभागीय जिल्हाधिकारी/उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी)/ सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, महाराष्ट्र राज्य .
१६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.महाराष्ट्र राज्य ,
१७.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८. उप सचिव ,(आस्थापना शाखा) सर्व मंत्रालयीन विभाग ,मंत्रालय ,मुंबई.
१९.सर्व मंत्री ,राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/मंत्रालय ,मुंबई.
२०.मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय ,मुंबई.
२१.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२२.सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२३.सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४.सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,

२५.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२६.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२७.विधिमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन ,मुंबई
२८. सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२९.सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य ,
३०.निवड नस्ती/कार्यासन १६-अ.